# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/10/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## विनयभंग

**१) पो.स्टे. रामटेक** :— दिनांक ०१/१०/२०२३ चे १०.०० वा. ते १०.३० वा. दरम्यान आरोपी नामे— १) ताराचंद भगत उईके २) ताराचंद भगत उईके ची पत्नी दोन्ही रा. आमडी ता. रामटेक यांनी फिर्यादी च्या सासुच्या घराचे बांधकामावरील लेबरला शिवीगाळ करीत असतांना फिर्यादीने आरोपीला घराचे बांधकाम सासुच्या जागेत आहे, असे म्हणुन हटकले असता, आरोपी क्र. १ व २ ने संगनमत करून फिर्यादीसोबत वादविवाद करून अश्लील शिवीगाळ केली व आरोपी क्र. १ हा कुदळ घेवुन फिर्यादीचे अंगावर धावला व उलटया हाताने फिर्यादीचे उजव्या गालावर दोन थापडा मारल्या व धक्काबुक्की केली. धक्काबुक्की करतांना आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे अंगातील ब्लाउज ओढले त्यामुळे फिर्यादीचे मनास लज्जा वाटली व कानातील रिंग पण पडले. आरोपी क्र. १ ने जर तुम्ही तेथे काम केले तर तुझ्या लेबरचे व तुमचे विटेने डोके फोडतो अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५४, ३२३, २९४, ५०४, ५०६, ३४ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार संजय पायक मो. नं. ८८३०९२३३१० हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक २९/०९/२०२३ चे १२.०५ वा. ते १३.३० वा. दरम्यान यातील आरोपी नामे— मनिष अरुण ठाकरे, वय २० वर्ष, रा. वाढोण (बु.) ता. कळमेश्वर याने उमाजी कातकाडे रा. वाढोणा बु. यांचा मोबाईल काही वेळेसाठी वापरण्याकरिता घेउन त्यांचे मोबाईलवरुन ओ.टी.पी. प्राप्त करुन स्वत:चे मोबाईलमध्ये वरील क्रमांकाचे व्हॉट्सअप अकाउंट तयार करुन फिर्यादीचे मोबाईल क्रमांकावर अश्लील मॅसेज पाठवुन शरीर सुखाची मागणी करुन फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(ड) भादवी सहकलम ६६(अ) माहीती तंत्रज्ञान अधिनियम सन २००० कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार धनराज भुक्ते मो. नं. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत मोरारजी कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक ०१/१०/२०२३ चे १०.३० वा. ते ११.०० वा. पर्यंत आरोपी नामे— १) सुखचंद्र गन्नु मडावी, रा. वैशाली नगर टाकळघाट २) दिपक शामराव मेश्राम रा. गांगापुर झोपडपटी + ३ इसम यांनी मोरारजी टेक्साईल कंपनीचा स्टोर रूम मध्ये ठेवलेली जुनी वापरती ३ केव्हि डीसीजी मोटार अंदाजे किंमती अंदाजे १५,०००/— रू २.५ डीझेड हॉसपावरची ईलेक्टीक मोटार किंमती २५,०००/— रू तसेच लोखंडी ग्रिल किंमती ५००/— रू, वॉटर फिल्टर किंमती अंदाजे ५०००/— रू. असा एकुण ४५,०००/— रूपयाचा नमुद आरोपीतांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— किशोर किष्णाजी ढगे वय ५४ वर्ष रा. रामनगर मॉस्टर कॉलनी हिंगणघाट ह. मु. मोरारजी कंपनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ४५४, ३८०, ५११, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पांडे मो. नं. ८८८८८३८९९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**